# चर्चा पत्रक
# चेतावणी/ऊपदेश
# मराठी

(३)


महत्वाची सुचना–रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांड्क यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

## प्रस्तावना

आपण या मनुष्य देहात सदाकरीता सुखी होण्यासाठी भक्ती करतो परंतु ज्या ही भक्त्या करतो त्या करुन ही आपण सदाकरीता सुखी होत नाही.या मनुष्य देहात प्रत्येक जण फक्त १०० वर्षांच्या सुखांचा विचार करतो परंतु हा मनुष्य देह निघून गेल्यानंतर माझा हा जीव कुठे जाईल?याला सदाकरीता सुखाचा देश प्राप्त होईल का? याच्या मागे जो जन्म मरणाचा फेरा लागला आहे तो सदाकरीता मिटेल का?या गोष्टींचा विचार आम्ही कधीही करीत नाही.माझा हा जीव सदाकरीता सुखी होण्यासाठी मी कोणती भक्ती केली पाहिजे?कोणते सतगुरु धारण केले पाहिजे?कोणत्या देशात गेल्याने माझा हा जीव सदाकरीता सुखी बनेल? हे आपण आजच्या सत्संगातून जाणून घेणार आहोत.

**जीवाला राहण्यासाठी कोण कोणते देश आहे हे आपण पाहू .**

२




## परात्परीपासून दोन देश आहेत.

१)सतस्वरुप देश–सतस्वरुप देश हे कालही होते,आजही आहे व उद्याही राहिल.अशी कोणती वेळ नव्हती की सतस्वरुप देश नव्हता व अशी कोणती वेळ येणार नाही की सतस्वरुप देश राहणार नाही.हा सतस्वरुप देश अथांग आहे,अपार आहे,विराट आहे,हा देश कुद्रती आहे. या देशामध्ये हंसाला फुकटात,बिना कष्टाने,ऊब न येणारे,नविन नविन प्रकारचे तृप्त सुख मिळतात.या सतस्वरुप देशामध्ये सर्व सुख कुद्रती आहे म्हणजेच सर्व सुख आदिपासून उपलब्ध आहेत.कुद्रती या शब्दाचा अर्थ आपण एका उदाहरणाद्वारे पाहू .

जसे–वैशाख महिन्यात कड्क उन्ह तापते. अशा महिन्यात आपण काश्मिरमध्ये गेलो तर तेथे आपल्याला कुद्रती थंडावा मिळतो.त्या थंडाव्यासाठी आपल्याला तेथे काही उपकरणे लावण्याची आवश्यकता नसते.असेच सतस्वरुप देशात कोणतेही कष्ट,मेहनत न घेता कुद्रती सुख मिळतात.असा हा अनंत कुद्रती महासुख देणारा सतस्वरुप देश आहे.

२) होणकाळ देश – होणकाळ देशात २ देश आहेत

१) जीवब्रम्ह देश – जीवब्रम्ह देश हा कुद्रती सुख व दु:ख विरहित देश आहे.

२) माया देश – या माया देशात तीनलोक(मृत्युलोक, स्वर्गलोक व पाताळलोक)व १४भवन ७ स्वर्गाचे भूर,भूवर,स्वर,महर,जन,तप,सत व ७ पाताळाचे तळ,अतळ,वितळ,सुतळ,तळातळ, रसातळ,महातळ असे एकूण १४ भवन आहे.ब्रम्हाचा सतलोक,विष्णुचा वैकुंठ,महादेवाचा कैलासलोक,शक्तीचा शक्तीलोक,यमाची यमपूरी असे आकाशपासून तर पाताळपर्यंत सर्व मायादेश आहे.या माया देशात थोडेसे कृत्रिम सुख व कुद्रती काळाचे अनंत महादु:ख असतात, कृत्रिम सुख म्हणजे सुख बनवावी लागतात.त्यासाठी कष्ट करावे लागतात,मेहनत घ्यावी

लागते.
उदा.आपणास लाडू खायचे असेल तर त्यासाठी लाडू बनविण्याची साधन सामग्री विकत आणावी लागेल त्यासाठी कष्ट करावे लागतील व मग त्या सामग्री पासून लाडू बनवावे लागतील तेव्हा आपण लाडू खाण्याचे सुख उपभोगू असे येथिल सुख कृत्रिम आहेत व त्याच बरोबर कुद्रती काळाचे महादु:ख जीवाला भोगावे लागतात जसे–गर्भाचे,तनाचे,मनाचे,येऊन येऊन पडणारे,म्हातारपणाचे,८४ लक्ष योनीचे,८४ प्रकारच्या नरकाचे,भूत पित्तर यासारख्या अगतीचे दु:ख भोगावे लागतात.

**या जीवाला कोण कोणते महादु:ख भोगावे लागतात हे आपण विस्ताराने पाहू .**

३

## महादु:ख

१) गर्भाचे दु:ख –



१) जीव मनुष्य देहात येतो तेव्हा आईच्या गर्भातून येतो.

२) तेव्हा प्रत्येक जीवाचे पाय वर व डोके खाली असे उलट्या स्थितीत ९ महिने लटकण्याचे दु:ख भोगतो.

३) गर्भात असतांना आईच्या पोटातील किळस येते असे मैला पाणी वारंवार नाका तोंडात घुसण्याचे दु:ख भोगतो.

४) गर्भवती आई लवकर लवकर चालते तेव्हा गर्भातील जीव दु:ख सहन होणार नाही असा बेहाल होऊन दु:ख भोगतो.

५) गर्भवती माता जेव्हा ओझे उचलते तेव्हा जीवाला फार भारी दु:ख होते.

६) गर्भवती आई अधिक जेवण करते तेव्हा जीवाचा देह गळतो म्हणजे कमजोर होतो असे देह गळण्याचे दु:ख सहन होत नाही असे दु:ख भोगतो.

७) गर्भाला लागून जठर आहे.जठराच्या उष्णतेमुळे गर्भ कुंडातील पाणी गरम होते हे गरम पाणी जीवाच्या नाजूक देहाला सहन होत नाही असे ९ महिने दु:ख झेलतो.

८)अशाप्रकारे गर्भातील वर्णन करु शकत नाही असे अनेक लहान मोठे खूप दु:ख भोगतो.जेव्हा गर्भात जीवावर असे अनेक दु:ख पडतात तेव्हा या दु:खातून निघण्यासाठी तो परमात्म्याची पुकार करतो.

साखी –

**ग्रभवास मे करे पुकारा । सुण हो सांई सिरझनहारा ।**
**दूजा दु:ख मोहो भुगतावे । ग्रभवास सुं बाहर ल्यावे ।**
**अबके बाहर करो बसेरा । निसदिन जाप करु हर तेरा ।**
**तुम कूं भुल कबू नहि जाऊँ । जे हर अबके बाहर आऊँ ।**
**हर कू छाड आन नहि ध्याऊँ । जे हर अबके बाहर आऊँ ।**

हा जीव गर्भवासात परमात्म्याची पुकार करतो व विणवणी करुन सांगतो,हे परमात्मा,तुम्ही मला

दुसरे दु:ख वाटेल तसे भोगवा परंतु या गर्भवासातून बाहेर आणा.आता माझा बाहेर बसेरा म्हणजे वस्तीस राहने करा म्हणजे मी रात्रंदिवस तुमचा जाप करीन.तुम्हाला मी कधीही भुलून जाणार नाही.जर हर मी बाहेर आलो तर तुला केव्हाही विसरणार नाही.मी हर म्हणजे रामजीस सोडून दुसऱ्या देवांचे ध्यान,पूजन,भजन करणार नाही.जर रामजी मी गर्भाच्या बाहेर आलो तर तुझ्याशिवाय अन्य दुसऱ्या देवास भजणार नाही.असा करार(वचन)या जीवाने गर्भवासात हरशी केला.

९) देह धारण केल्यामुळे आधी म्हणजे मनाचे,व्याधी म्हणजे तनाचे व उपाधी म्हणजे जीवाचा काहीही संबंध नाही असे अनेक दु:ख पड्तात ते भोगतो.

१) **आधी** – मनाचे दु:ख

उदा.एका व्यक्तीची झोपडी आहे व दुसऱ्या व्यक्तीचा बंगला आहे.ज्या व्यक्तीची झोपडी असते तो दुसऱ्या व्यक्तीचा बंगला बघून त्याचे मन माझा असा बंगला कधी होईल यासाठी रात्रंदिवस झुरत असते.

२) **व्याधी** – शरीराच्या कोणत्याही दु:खांना व्याधी म्हणतात.

उदा.डोळ्यांनी दिसत नाही,कानाने ऐकू येत नाही,पायाने चालता येत नाही,खूप कष्ट देणारे अनंत प्रकार चे रोग इत्यादी.

३) **उपाधी** – आपल्या प्रारब्धाशी वैयक्तिक काहीही संबंध नसतांना जे दु:ख भोगावे लागतात त्यांना उपाधी म्हणतात.

उदा.१) आपण रस्त्याने जात आहे व बाजूने कार चालली आहे.कारच्या चाकाखाली दगड येऊन तो अचानक उसळून आपल्या डोक्याला लागतो व जखम होते.

२) मुले चेंडू खेळत आहेत व आपण दूर अंतरावर बसलो आहे तरी ही मुलांचा चेंडू खेळता खेळता उसळून आपल्या डोक्याला लागतो.

३) आमचा काही संबंध नसतांना आमच्या घरासमोर कोणाचे भांड्ण किंवा खून झाला त्या कारणामुळे पोलीस आम्हांला वारंवार झालेल्या भांड्णाबद्दल विनाकारण त्रास देत देत विचारणा करतात.


## २) यमाचे दु:ख –




१)जो जीव या मनुष्य देहात पापकर्मी देवतांची म्हणजे ज्या देवतांना प्रसाद म्हणून निरअपराधी प्राण्यांची बळी लागते किंवा नर बळी लागते अशा देवतांची भक्ती करतो.अशा जीवाला तसेच जो जीव या मनुष्य देहात निचकर्म करतो,अति हलके कर्म करतो, जसे मांस खाणे,दारु पिणे इ. अशा जीवांना अंतीम समयी यमदूत घ्यायला येतात.

२)हे यमदूत मनुष्य शरीरात दोन डोळ्यांचे,दोन कानांचे,दोन नाकाचे,एक मुखाचे,एक लिंग व गुदेचे अशा नऊ द्वारातुन प्रवेश करतात व त्या जीवाच्या शरीरात याचनिक देह बनवितात व त्याच बरोबर जीवाला खूप मार मारत मनुष्य देहाच्या बाहेर काढतात.

३) हा याचनिक देह कसा असतो तर या देहाला कितीही यातना दिल्या तरी देहातून प्राण बाहेर निघत नाही व जेवढ्या यातना या देहाला दिल्या जातात त्या सर्व यातना दिल्यापेक्षा जास्त लागतात असा हा याचनिक देह आहे.
४) हे यमदूत जीवाच्या डोक्यावर घन,गुरुज,घूँसा अशा प्रकारचे हत्यारे वापरुन मार देतात.
५) जीवाला आपल्या विक्राळ मोठमोठ्या दातांनी वाजवून भिववितात.
६) तर काही यमदूत जीवाच्या गळ्याच्या नसा तोडून–तोडून खातात.
७)जीवाच्या गळ्यात फाशी टाकतात.त्या फाशीचा दोर रेड्याच्या शेपटीला बांधून अनेक जुलूम करत ओढत यमद्वारात घेऊन जातात.
८) मृत्युलोकातून यमलोकापर्यंत नेतांना रस्त्यात तऱ्हे–तऱ्हेचे दु:ख भोगवितात.
९) यम रस्त्यात जीवाला दु:ख देणारी एक अद्‌भूत नदी असते.त्या नदीतून हे यमदूत त्या जीवास चालवितात.
१०) त्या नदीतील पाणी अग्नीसारखे गरम व रक्तासारखे लाल असते.त्या नदीत तिक्ष्ण खिळ्यासारखे काटे असतात व त्या नदीत अनेक प्रकारचे विषारी प्राणी असतात.ते जीवाला अनेक प्रकारे दंश करतात.अशा नदीतून हे यमदूत गळ्यात फाशी टाकलेल्या जीवाला नेत असतात.रस्त्यात चालतांना एकमेकात कठिण गुंतलेली वनराई लागते.अशाप्रकारे अनेक जुलूम करत ओढत यमद्वारात हे यमदूत जीवाला यमराजासमोर घेऊन जातात.
११) हा यमराज फार जालीम आहे,फार जुलूमी आहे,फार विक्राळ आहे.
१२) त्या यमराजाच्या हाताखाली १४ यम असतात तेही विक्राळ जुलमी आहे.प्रत्येक यमाच्या हाताखाली जीवाला पकडून आणण्याकरीता व जीवाला नाना प्रकारचा मार देण्याकरीता १४ कोटी यमदूत चौऱ्यांशी लक्ष प्रकारच्या हत्यारांनी सज्ज असे जीवाला मार देण्याकरीता तत्पर असतात.
हे यमदूत या जीवाला यमराजा समोर उभे करतात तेव्हा यमराज चित्र गुप्तला या जीवाचा लेखा जोखा विचारतो.




साख्या

**१) धरमराय जब लेखा मांगे ।। किया कोल चितारे ।।**
**लीला पांव करे मुंह काळो ।। शिर मे मुगदर मारे ।।**

अर्थ :–धर्मरायाच्या दरबारात मनुष्य तन मागितले आणि रामनामाची भक्ती करेल.रामनामी संतांची सेवा करेल असा धर्मरायाशी धर्मरायाच्या दरबारात करार केला होता.जीवाचा अंतिम समय येतो जीव देह त्यागतो तेव्हा यमदूत धर्मरायाच्या समोर पकडून घेऊन जातात आणि उभे करतात. तेव्हा धर्मराय करारानुसार जीवाने रामनाम केले नाही तसेच संतांची सेवा केली नाही आणि नर्कात पडण्यासारखे निचहून निच कर्म केले असे चित्र,गुप्त सांगतात तेव्हा धर्मराय यमदूतांना जीवाचे हात पाय हिरवे होतील तोपर्यंत अनेक प्रकारच्या अस्त्रांनी मारायला सांगतो.तोंड मारुन

मारुन काळे पडेल तोपर्यंत मारायला सांगतो तसेच शिरावर भारी खिळ्यांनी बनलेली मुगदर ने मार द्यायला लावतो.
या जीवाला हे दु:ख भोगण्याचे कारण काय आहे ?

**२) हँस हँस किया न छुटे रोया ।। किया कबाडा हाता ।।**
**घडी घडी दम दम का लेखा ।। चित्र गुप्तर के खाता ।।**

अर्थ :- इथे जीव हसून हसून म्हणजे आनंद घेऊन घेऊन दुसऱ्यांना खूप दु:ख होईल असे कुकर्म करतो.हे हसून हसून हातांनी केलेले कुकर्म तेथे रडल्यावरही सुटत नाही.येथे जेही घडी घडी,पलापलात केलेल्या कुकर्माचा लेखाजोखा म्हणजे हिशोब चित्र,गुप्तच्या खात्यात लिहिलेला असतो.

१३) अतिशय निचकर्मी जीवाला १४ कोटी यमदूत व १४ यम यांच्यापेक्षा जास्त जुलूम करण्याचे बळ व कला असलेला यमराज जातीने आपल्या जुलूम दरबारात असह्य दु:ख भोगवित नेत असतो.

१४) केलेल्या कर्माप्रमाणे यमराज ८४,००,००० प्रकारच्या हत्याराने सहन न होणाऱ्या यातना देतो.

## ८४ लक्ष योनीचे दु:ख

१) प्रत्येक जीवाला ८४००००० योनीचे दु:ख भोगावे लागते.ही ८४ लक्ष योनी खालील प्रमाणे चार खाणींची बनलेली आहे.
२) जसे - जरायुज - गर्भातून येणारे - बकरी,गाय इ.
अंडज -अंड्यातून येणारे - कोंबडी,साप इ.
अंकुर - बीजातून येणारे - झाड
उद्‌बीज - ज्याच्या बीजाचे उगम समजत नाही.
३)यात मनुष्यदेह सोडून अन्य ८३,९९,९९९ योनीत ४३,२०,००० वर्षांकरीता पराधीन होऊन पळापळात तनाचे,मनाचे,येऊन येऊन पडणारे दु:ख भोगत राहतात.
४) ८४,००,००० योनीमध्ये बालद्याचा बैल बनतो.गाडी ओढण्याची गरज असलेल्या बळापेक्षा जास्त लादलेली गाडी भूक,तहान,आजारपण सहन करत ओढत राहतो.
५) डोंबारीचा पूर्ण संसार पाठीवर घेऊन डोंबाऱ्याच्या इशाऱ्यावर तहान,भूक,आजापण सहन करीत डोंबाऱ्याचा घोडा बनून फिरत राहतो.
६) असे आंधळे,बहिरे,लंगडे,लुळे,रोगीट चार खाणीतले देह धारण करीत दु:ख सहन करीत फिरतो .
७) या ८४,००,००० योनीतील प्रत्येक योनीचे दु:ख सांगणे खूप कठीण आहे.मोजके उदाहरण दिलेली आहेत.
८) या सर्व प्राण्यांचे दु:ख डिसकव्हरीमध्ये छोट्या प्रमाणात पहायला मिळतात.
९) त्यापेक्षा अनंत पटीने ८४,००,००० योनीतील जीव दु:ख भोगतो.

## अगतीचे दु:ख

जीव ज्या योनीत अतिशय दु:ख भोगतो त्या योनीला अगती योनी म्हणतात.

१) परमात्म्याने आपल्याला या मनुष्य देहात ७७,७६,००,००० श्वास दिले आहेत.

२) ज्यांचे एवढे दिलेले श्वास पूर्ण होत नाही अपूर्ण श्वासात मरण होते जसे–आत्महत्या करणे,सर्पदंशाने मरण होणे,अपघाताने मरण होणे असे जीव अगती योनीत जातात तसेच जो मनुष्य सतस्वरुपी संतांशी वैर ठेवून जीवे मारण्याचा विचार करतो किंवा जो मनुष्य सतस्वरुप परमात्म्याची निंदा करतो व बळी मागण्याऱ्या देवतांची बळी देवून त्यांची शोभा करतो तो जीव अगती योनीत कठीण दु:ख भोगतो.



३) त्यांना अगतीचा देह मिळतो म्हणजेच ते भूत,पित्तर बनतात.

४) त्यांचा देह कसा असतो तर सुईच्या टोका एवढे तोंड असते तर खूप मोठे पोट असते.

५) हे जीव पाची विषयांसाठी(शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध)अतृप्त राहतात.

६) त्यांचा देहच असा बनतो की त्या देहाने त्यांना एकही सुख घेता येत नाही.
जसे – याला पाण्याची तहान लागली आहे तर हा पाणी पिण्यासाठी विहिर,नदी,तलाव या ठिकाणी गेला तर तेथे देवतांचा पहारा असतो.हे देवता याने पाणी पिऊ नये म्हणून त्याला बेदम मार देतात व हा पुन्हा त्या ठिकाणी जात नाही.

७) मळ विसर्जन केल्यावर गुदा धुण्याकरीता जे पाणी वापरतात ते पाणी प्यायला मिळते.

८) यांच्या दु:खाची वयोमर्यादा नसते.

९) यांच्या कुळात कोणी सतस्वरुप विज्ञानी संत झाला तरच हे त्या योनीतून सुटतात,नाही तर युगानयुग अनेक विधीचे दु:ख सहन करतात.

१०) पाची सुखांकरीता अतिशय अतृप्त असे दु:ख भोगीत भटकत फिरतात.

**हे महादु:ख जीवाला का भोगावे लागतात तर कर्मांमुळे .**

**कर्म कोण कोणते आहे हे आपण पाहू.**

४

## कर्म

१) क्रियेमान कर्म –मनुष्य देहात जे प्रारब्धात नव्हते असे जे नवीन नवीन कर्म करतात त्याला क्रियेमान कर्म असे म्हणतात.

२) संचित कर्म –युगायुगापासून या जीवाने आजपर्यंत मनुष्य देहात जे कर्म केले व त्यापैकी जे भोगायचे राहून गेले अशा सर्व कर्मांना संचित कर्म म्हणतात.

३) प्रारब्ध कर्म –संचित कर्मातून जे कर्म देहासोबत भोगण्यास मिळतात त्याला प्रारब्ध कर्म म्हणतात.

५

## मनुष्य देह



१) हा मनुष्य देह आपल्याला कसा मिळाला आहे.

**भटकत भटकत नीट मिल्यो हे । मानव तन ओतारा ।।**

हे मनुष्य देह म्हणजे चौऱ्यांशी लक्ष योनी कापण्याचा अवतार चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये मोठे मोठे जुलूम,कष्ट सहन करुन भटकून भटकून मोठ्या मुश्किलीने थोड्या वेळा करीता मिळाला आहे.

२) मनुष्य देह हा सतयुग,त्रेतायुग,द्वापारयुग,कलियुग या चार युगातून एकदाच मिळतो .

३) जगामध्ये अनेक प्रकारचे देह आहेत.

जसे–ब्रम्हाचा देह,विष्णुचा देह,शंकराचा देह,शक्तीचा देह,इंद्राचा देह,३३ कोटी देवतांचा देह, मनुष्य देह,८४ लक्ष प्रकारचे देह,नरकाचा देह,पाताळाचा देह,राक्षसाचा देह,भूत,पितराचा देह परंतु मनुष्य देह सोडून या कोणत्याही देहामध्ये अमरलोकामध्ये घेऊन जाणाऱ्या परमात्म्याच्या नावाचा संचय होत नाही म्हणून सर्व देहांमध्ये मनुष्य देह फार भारी आहे,मोठा आहे.

४) याच मनुष्य देहाने अनंत जन्मांचे कर्म मिटवता येतात .

५) याच मनुष्य देहाने सदाकरीता महादु:ख मिटवून महासुखी बनता येते .

६)याच मनुष्य देहाने परमात्मास्वरुप बनता येते व परमात्म्याच्या अमरलोकाला पोहचता येते म्हणून सर्व देवी देवता या मनुष्य देहाची चाहणा करतात.

७) जसा हा मनुष्य देह भारी आहे तसा तो क्षणभंगुर ही आहे.

८) क्षणभंगुर म्हणजे एकाच क्षणात मनुष्य देहाचा विनाश होतो.

९) **पाणी केरा बुदबुदा । अस मानस की जात ।।**
**एक दिना छिप जाएगा । ज्यों तारा परभात ।।**

पाण्याचा बुड्बुड्यासारखे मनुष्याचे शरीर क्षणभंगुर आहे.जसा पाण्याचा बुड्बुडा फटकन फुटून जातो त्याला फुटण्यास वेळ लागत नाही.असाच मनुष्य देह हातातून जाण्यास वेळ लागत नाही.जसे पहाट होताच आकाशात चमकणारे तारे लपून जातात तसेच हा देह ही एक दिवस मिटून जाईल.

६

## फळफूल

आता आपण कोणत्या भक्तीचे काय फळ आहे हे पाहू .

जगात तीन प्रकारच्या भक्त्या आहे .

१) सगुण भक्ती २) निर्गुण भक्ती ३) सतस्वरुप भक्ती

१) सगुण भक्ती :–

१) **ब्रम्हा–** जो या मनुष्य देहात ब्रम्हाचा सांख्ययोग साधतो,गायत्री संध्या साधतो तो जीव

मनुष्य देह सुटल्यानंतर ब्रम्हाच्या सतलोकात जाऊन सुख भोगतो व सांख्ययोग साधतांना किंवा गायत्री संध्या साधतांना जाणते–अजाणते अशुभ कर्म झालेत ते भोगण्यासाठी ८४,००,००० योनीत पडून दुःख भोगतो.

२) **विष्णु** –जो या मनुष्य देहात विष्णुची नवविद्या भक्ती उदा.(श्रवण,किर्तन,स्मरण, पादसेवा,पूजा,वंदना,दास्य,सख्य,आत्मनिवेदन)असे नऊ प्रकारचे नियम पाळून करतो तो जीव हा मनुष्य देह सुटल्यानंतर विष्णुच्या वैकुंठात जातो.

त्याला १) सालोक्य – वैकुंठात प्रवेश मिळणे.

२) सामीप्य– विष्णूच्या सभेत बसणे.

३) सायूज्य– विष्णूच्या शेजारी भावाप्रमाणे बसणे .

४)सारुप्य–विष्णूसारखे होणे या चार मुक्त्यांपैकी एक मुक्ती मिळते व विष्णु भक्तीचे शुभ कर्म करतांना जाणते–अजाणते जे अशुभ कर्म झाले त्या कारणाने महाप्रलयानंतर ८४,००,००० योनीचे दुःख भोगतो.

३) **शंकर**–जो या मनुष्य देहात शंकराचा हटयोग साधतो.त्याचप्रमाणे शिवाचा जप करतो तो जीव मनुष्य देह सुटल्यानंतर शंकराच्या कैलासात जाऊन सुख भोगतो व सुकृत संपल्यावर जाणते अजाणते झालेल्या निच कर्मामुळे गर्भात येऊन पडतो व ८४,००,००० योनीचे दुःख भोगतो.

**शक्ती** – जो या मनुष्य देहात शक्तीची भक्ती म्हणजे लभेद साधतो,अभयदान करतो, कन्यादान करतो तो मनुष्य देह सुटल्यावर शक्तीच्या लोकात जातो व शक्तीची भक्ती साधतांना जाणते अजाणते अशुभ कर्म झाल्यामुळे गर्भात येऊन ८४,००,००० योनीचे असह्य दुःख भोगतो.

५) **इंद्र** – जो या मनुष्य देहात १०१ यज्ञ करतो तो जीव मनुष्य देह सुटल्यानंतर तेहतीस कोटी देवतांचा राजा इंद्र बनतो व १०१ यज्ञ करतांना जे जाणते अजाणते अशुभ कर्म होतात त्यामुळे ८४,००,००० योनीत दुःख भोगतो.

६) **सत जत तप**– जो या मनुष्य देहात सत,जत,तप साधतो तो मनुष्य देह सुटल्यानंतर स्वर्गात जातो.तेथील पुण्यकर्म संपल्यावर नर्कासारखे निचकर्म घडल्यामुळे नर्कात पडतो व नर्क भोगने झाल्यावर ८४,००,००० योनीत पडतो किंवा ज्यांचे नर्कासारखे निचकर्म झालेच नाही तो ४३,२०,००० वर्षाकरीता सरळ सरळ ८४,००,००० योनीत पडतो.

७) **तीर्थ** –जो या मनुष्य देहात तीर्थ करतो त्याला पुढे जेव्हा मनुष्य देह मिळेल तेव्हा रुपवान काया मिळते,त्याचप्रमाणे मानव देह मिळेपर्यंत सर्व ८४ लक्ष योनीत रुपवान काया मिळते.

८) **व्रत उपवास** – जो या मनुष्य देहात व्रत,उपवास करतो त्याला पुढे जेव्हा मनुष्य देह मिळेल तेव्हा निरोगी काया मिळते,त्याचप्रमाणे मनुष्य देह मिळेपर्यंत ८४,००,००० योनीच्या सर्व देहात त्याला निरोगी काया मिळते.

९) **तप** – जो या मनुष्य देहात तप साधतो तो पुढच्या मनुष्य देहात राजा बनतो,त्याचप्रमाणे

मनुष्य देह मिळेपर्यंत ८४,००,००० योनीच्या सर्व देहात राजासारखे सुख भोगतो.

१०)**यज्ञ**–जो या मनुष्य देहात यज्ञ करतो तो पुढच्या मनुष्य देहात धनवान बनतो,त्याचप्रमाणे मनुष्य देह मिळेपर्यंत ८४,००,००० योनीच्या सर्व देहात धनवानासारखे सुख भोगतो.

११) **पापकर्ते देवता** – जो या मनुष्य देहात प्रसाद म्हणून बळी मागणाऱ्या देवी देवतांची उदा. भैरु,पीर,सितला,भोपा,पित्तर,कालिका,क्षेत्रपाळ इ.देवी देवतांची भक्ती करतो व त्यांना निरपराधी प्राण्यांची किंवा बालकांची बळी देतो तो जीव नर्कात पडून अतिशय कठीण दु:ख भोगतो किंवा अगतीसारख्या अतिशय कठिण दु:खाच्या योनीत पडतो व दु:ख भोगतो.

२) निर्गुण भक्ती – २ प्रकार

१) **जीवब्रम्हची भक्ती** – जो या मनुष्य देहात सर्वामध्ये ब्रम्ह ब्रम्ह पाहतो तो जीवब्रम्ह देशाला पोहचतो तो जो पर्यंत या ब्रम्हदेशात राहतो तो पर्यंत जन्म मरणाच्या चक्रात येत नाही परंतु या ब्रम्हपदात जीवाला सुख दु:ख मिळत नाही.तेथे राहून त्याला जेव्हा उब येते,कंटाळा येतो तेव्हा तो जीव सुखाच्या इच्छेने गर्भात येतो व नंतर जन्म मरणाच्या चक्रात पडतो आणि काळाचे महादु:ख भोगतो आणि कोण्या जीवाला तेथे महाप्रलयापर्यंत उब येत नसेल तर तो तेथे महाप्रलयापर्यंत राहतो पुन्हा सृष्टी रचना होते तेव्हा तो गर्भात येतो व जन्म मरणाच्या चक्रात पडतो,काळाचे दु:ख भोगतो.

२) **होणकाळ पारब्रम्हची भक्ती**–जो या मनुष्य देहात होणकाळ पारब्रम्हची भक्ती साधतो म्हणजेच सोहम जाप अजप्पा साधून बंकनाळेच्या रस्त्याने दहाव्याद्वारा पर्यंत पोहचतो तो जीव देह सुटल्यावर होणकाळ पारब्रम्ह देशापर्यंत पोहचतो.जो पर्यंत हा जीव या देशात राहतो तोपर्यंत त्याला सुख दु:ख मिळत नाही.जोपर्यंत या देशात राहतो तोपर्यंत तो जन्म–मरणाच्या चक्रात येत नाही.काही काळासाठी तो ८४ लक्ष योनीच्या फेऱ्यातून मुक्त होतो परंतु जेव्हा याला पारब्रम्ह देशात ऊब येते तेव्हा तो सुखाच्या इच्छेने खाली येतो व गर्भाचे दु:ख भोगतो.

३)**सतस्वरुप भक्ती**–जो या मनुष्य देहात सतस्वरुपाची भक्ती सतस्वरुपी विज्ञानी सतगुरुंच्या भेदाने येत्याजात्या श्वासात राम नामाचे स्मरण करुन करतो व पूर्वेचे ६ कमळ व पश्चिमेचे ६ कमळ छेद्न करुन दहाव्याद्वारी पोहोचतो तो जीव मनुष्य देह सुटल्यावर सदाकरीता महादु:खातून निघून जातो व महासुखाच्या देशात पोहोचतो तेथून परत गर्भात पडण्याची रीत नाही.

७

## जीवाला महादु:खातून काढणारा व महासुखाच्या देशाला पोहचविणारा परमात्मा कसा आहे व कोठे आहे

१) परमात्मा हा सतस्वरुप आहे.

२) तो ५२ अक्षराच्या पलिकडे ने:अक्षर आहे त्यामुळे तो ५२ अक्षरात बोलला जात नाही व अक्षरात लिहून दाखविता येत नाही.

३) त्याचे वर्णन आपण शब्दात करु शकत नाही.

४)  त्याचे ने:अक्षर नाव जीभेने बोलता येत नाही.
५)  तो सर्वांना सुख देणारा आहे.
६)  सर्वांचे दु:ख हरण करणारा आहे.
७)  तो आपल्यासारखा आईच्या गर्भात येत नाही .
८)  तो आपल्यासारखे कोणतेही दु:ख भोगत नाही.
९)  तो परमात्मा अखंड्ति ध्वनिस्वरुप आहे.
१०)  त्याची गती कोणी जाणू शकत नाही असा तो अविगत आहे.
११)  असा हा परमात्मा आपल्या आत्म्यातच आहे.हिच गोष्ट कबीरजी एका साखीत समझवितात.

**कस्तुरी कुंड्ल बसै, मृग ढुँढे बन मांहि ।**
**ऐसे घट घट राम है, दुनिया देखै नांहि ।।**


कबीर साहेब म्हणतात कि,मनुष्य परमात्म्याला प्राप्त करण्याकरीता इकडे–तिकडे भटकतो, जेव्हा की परमात्मा त्याच्या आत मध्येच आहे.
जसे–कस्तुरी मृगाच्या नाभीमध्येच असते परंतु मृग हे जाणत नाही आणि भ्रमित होऊन सगळ्या वनात त्याला शोधत फिरतो अशाप्रकारे घटा घटात म्हणजे आत्म्यामध्ये राम आहे परंतु मनुष्य त्याला भ्रमाच्या कारणाने पाहू शकत नाही.

८

## गुरु सतगुरु


**जसे जगात तीन प्रकारच्या भक्त्या आहेत तसेच तीन प्रकारचे गुरु ही आहेत.**

**✱ सगुणाचे गुरु**




१)जे गुरु जीवाला ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतार यांचे जप,तप, तीर्थ,व्रत,उपवास,यज्ञ करायला लावतात.
२) तसेच मुर्तिपूजा करायला लावतात.
३) कानात त्यांच्या नावाचे मंत्र देतात.
४)  योगाभ्यास करायला लावतात(नेती,धोती,नवली,कपाली,बस्ती,त्राटक)
५)  जे एका पळात पृथ्वीलोक,पाताळलोक,स्वर्गलोक फिरुन येऊन जातात.
६)  जे पृथ्वीलोक,स्वर्गलोक,चार दिशा हातावर दाखवितात.
७)  जे धरती आकाशाचा भंग करुन परत धरती ,आकाश जसेच्या तसे स्थापन करतात.
८)  जे गुरु शिष्याच्या मनातील गोष्ट सांगतात .
९) जे शिष्याला संसारातील सुखांची प्राप्ती करुन देतात ते सर्व हद्दीतील गुरु आहे.
१०)  हे गुरु जीवाला वैकुंठापर्यंत पोहोचवतात.
११)  असे हे गुरु जीवाला काळाच्या मुखात ठेवतात.
१२)  हे गुरु आत्म्यात परमात्मा आहे हे जाणत नाही.

✻ निर्गुणाचे गुरु




१) जे गुरु जीवाला प्रत्येकात ब्रम्ह पाहायला लावतात किंवा सोहम जाप अजप्पा जपून बंकनाळेच्या रस्त्याने चढवून दहाव्याद्वारापर्यंत पोहचवितात ते निर्गुणाचे गुरु आहे.


२) हे गुरु जीवाला निर्गुणापर्यंत पोहचवितात.

३) जीव हा निर्गुण देशात पोहचला तरी काळाच्या मुखातच राहतो, महासुखाच्या देशात जात नाही .

**सतस्वरुपाचे सतगुरु**

१) खरे सतगुरु कसे असतात ते आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,

**आ सतगुरु की पारखा,सुणज्यो चित दे कान ।।**
**केवळ बिन सुखराम कहे,भजे न दुजी आन ।।**




खऱ्या सतगुरुची पारख चित्त,कान देवून ऐका.खरे सतगुरु फक्त कैवल्य रामाचे भजन करतात व अन्य ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती, अवतार यांना भजत नाही.

२) खऱ्या सतगुरुच्या घटात पायाच्या नखापासून ते डोक्याच्या शेंडीपर्यंत सतस्वरुप परमात्मा प्रगट आहे.

३) खरा सुख देणारा परमात्मा कोण आहे,खोटी सुख देणारी व काळाच्या मुखात टाकणारी माया कोणती आहे हे जे तऱ्हेतऱ्हेने सांगतात ते खरे सतगुरु आहेत.

४) जे संत साहेबाच्याशिवाय ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती या त्रिगुणी मायेस मानीत नाही तेच संत सतगुरु आहेत.

५) जे संत परमेश्वरावर सदा अवलंबित असतात,सतस्वरुप परमेश्वराला सदा आपल्या कायेतच पाहतात ते संत खरे सतगुरु आहेत.

६) जे संत बंकनाळेच्या रस्त्याने उलटून ब्रम्हंडात म्हणजे दहाव्याद्वारी पोहचलेले आहेत ते संत खरे सतगुरु आहेत.

७) ज्या संताची मायेच्या सुखाची आशा मिटून गेली आहे ते संत सतगुरु आहेत.


**अशा सतगुरुच्या शरणात आलेला हंस ६ पूर्वेचे व ६ पश्चिमेचे कमळ छेदन करुन दहाव्याद्वारी कसा जातो.**

१) मनुष्य देहात जे जीव सतस्वरुपी विज्ञानी सतगुरुच्या शरणात जातात.

२) असे सतगुरु त्या शिष्याला निजमनाने येत्या जात्या श्वासात राम नाम घ्यायला लावतात.

३) तेव्हा कंठस्थानी असलेल्या आत्म्यात परमात्मा प्रगट होतो व त्याचा देह खंड ब्रम्हंड बनतो.

४) हा जीव/हंस जेव्हा सतस्वरुपाच्या रस्त्याने जायला निघतो तेव्हा त्याला खंड म्हणजे ३ लोक १४ भवन व ब्रम्हंड म्हणजे ३ ब्रम्हचे १३ लोक दिसायला लागतात.




५) पूर्वेच्या रस्त्याने चालतांना प्रथम सरस्वती विराजमान असलेल्या कंठातील ४ पाकळीचे कमळ छेदन करतो.

६) पुढे हृदय कमळात विराजमान असलेल्या महादेव पार्वतीच्या ८ पाकळीच्या स्थानात येतो व ते स्थान छेदन करतो व पुढे मध्यस्थानावर येतो. येथे १६ पाकळीचे कमळ छेदन करतो.

७) पुढे ३२ पाकळीच्या विष्णु–लक्ष्मीच्या स्थानाला छेदन करतो. या स्थानी हंसा सोबतच्या ५ आत्मा हंसापासून वेगळ्या होतात.

८) पुढे ब्रम्हाच्या लिंगस्थानी प्रयास करतो. तेथे ६ पाकळीच्या कमळावर ब्रम्हा बसलेला आहे,हे स्थान छेदन करतो.

९) पुढे ६४ पाकळीवर ४ पाकळीच्या कमळावर विराजमान असलेल्या गणपतीच्या मुळघरी येतो ते कमळ छेदतो.

१०) अशा प्रकारे सतगुरुच्या विज्ञान कृपेने पूर्व दिशेचे संखनाळेचे सहा कमळ छेदन करुन पश्चिम दिशेच्या बंकनाळेच्या रस्त्याला लागतो व तेथे बंकनाळ छेदतो.

११)पुढे २१ स्वर्गाच्या रस्त्याने चालतो २१ स्वर्ग सोडल्यावर यमराजाच्या मेरुस्थानी पोहोचतो.

१२) यमराजाच्या डोक्याची पायरी करुन त्रिगुटीमध्ये पोहोचतो.तेथे २ पाकळीचे कमळ आहे. तेथे उजवीकडून गंगा,डावीकडून यमुना व डोक्याच्या मध्यभागातून वरुन सरस्वती अशा तिन्ही नद्यांच्या संगमात पोहोचतो. या स्थानी हंसासोबत असलेले मन हंसापासून वेगळे होते.

१३) पुढे १० वा चिदानंद ब्रम्ह, ११ वा शिवब्रम्ह, १२ वा पारब्रम्ह छेदन करुन दहाव्याद्वारी पोहचतो.दहाव्याद्वाराला पोहचवल्यावर रोमा रोमात ध्वनी स्वरुप परमात्मा प्रगट होऊन जातो. असा पूर्ण घटात परमात्मा प्रगट झाल्यावर सर्व संचित कर्म नष्ट होऊन जातात व क्रियेमान कर्म लागण्याची रीत बंद होते.

१४) पुढे १ कोटी ३५ लक्ष योजन घेरा असलेली व ३२ कोस जाडी, ४५ लक्ष योजन लांबी व रुंदी असलेली सिद्धशिळा सतस्वरुप विज्ञानाने फोडतो व दहावेद्वार उघडून सतस्वरुपाला पोहोचतो.

१५) अशा प्रकारे जीव मन व ५ आत्मा व त्रिगुणी मायेशी लागून केलेले संचित कर्म नष्ट करतो व जीवाला शरीरात प्रगट झालेल्या अंखडित विज्ञान कलेने क्रियेमान कर्म लागत नाही व जीव प्रारब्ध कर्म भोगून महासुखाच्या अमरलोकात सदाकरीता पोहोचतो.

**सतगुरु कोणत्या रामाचे स्मरण करायला लावतात.**

१०

## जगात चार प्रकारचे राम आहे.

**कबीर साहेब म्हणतात,**

**एक राम घट घट बोले, दुजा राम दशरथ घर डोले ।।**
**तिजा राम का सकल पसारा, चौथा राम सबसु ही न्यारा ।।**

१) **आत्माराम** – आत्म्याची भक्ती

जगात देह धारण केलेल्या चारी खाणीतील निर्बळ जिवांचे,आत्म्यांचे पोषण करणे,पालन करणे इ.उदा.मुंगीपासुन हत्तीपर्यंत सर्व आत्म्यांवर दया ठेवतो,तो जीव फार तर स्वर्गापर्यंत पोहचतो. तेथे पुण्यकर्म असेपर्यंत राहतो व पुण्यकर्म संपताच पुन्हा जन्म मरणाच्या फेऱ्यात येतो.

२) **रामचंद्र** – रामचंद्र हा विष्णुचा अवतार आहे .

अशा रामचंद्राची विष्णुचा अवतार समजून नवविद्या भक्ती केल्याने विष्णूच्या लोकात जातो. तेथे पुण्यकर्म असेपर्यंत राहतो व पुण्यकर्म संपताच पुन्हा जन्म मरणाच्या फेऱ्यात येतो .

३) **बिंदूराम** – बिंदूराम म्हणजे होणकाळ पारब्रम्ह.

होणकाळ पारब्रम्हची सोहम जाप अजप्पा विधी साधल्याने जीव होणकाळ पारब्रम्हला पोहोचतो परंतु तो परत कधीना कधी गर्भात येऊन सृष्टीत येतो.

आत्माराम,दशरथ पुत्र रामचंद्र व बिंदूस्वरुप पारब्रम्ह होणकाळ या तिघांची भक्ती केल्याने आवागमन सुटत नाही.ह्या तिघांपेक्षा न्यारा असा जो सतस्वरुप पारब्रम्ह राम आहे याची भक्ती केल्याने जीवाचे आवागमन सुटते.


४) **सतस्वरुप पारब्रम्ह राम**–सतस्वरुप पारब्रम्ह रामाचे येत्या जात्या श्वासात राम नाम घेऊन भक्ती केल्याने जीवाचे आवागमन सुटते व तो सदाकरीता अनंत महासुखाच्या देशात जातो. अनंत महासुख देणारा अमरलोक कसा आहे हे आपण पाहू.

११

## अमरलोक

संसारात जसे दोन गोष्टी सोबत आहेत .

उदा. सुख × दु:ख
स्त्री × पुरुष



दिवस × रात्र

शुभ × अशुभ

असेच मृत्युलोक आहे तर अमरलोक ही आहे.

**मृत्युलोक–**हा मिटणारा देश आहे.आज आहे तर उद्या नाही व उद्या आहे तर परवा नाही. सदा राहणारा देश नाही.

**अमरलोक–**हा सदा राहणारा देश आहे.हा कालही होता,आज ही आहे व उद्याही राहील.

**अमरलोकात कशा प्रकारचे सुख आहे .**

१) अमरलोकात गेलेल्या हंसाला ज्या सुखाची चाहणा असते ते सर्व सुख सन्मुख येऊन उभे राहतात.त्या सुखांपैकी हंसाला जे प्रिय वाटते ते सुख घेऊन घेतो.

२) अमरदेशात गेलेल्या हंसाला १२०० फुटाची दिव्य,सदा अमर असलेली काया मिळते.त्या कायेच्या एका रोमातून १०० लक्ष सूर्याचा नूर म्हणजे तेज निघत असतो.

३) तो देह होणकाळातील मायेच्या देहासारखा कधीही थकत नाही त्यामुळे तो अमर लोकात अखंडित सुख भोगतो.

४) तेथील हंस हसतो तेव्हा त्याच्या मुखातून हिरे मोती झडतात.

५) प्रत्येक संताच्या गळ्यात मोत्यांची माळ असते.

६) ज्या वस्तुंची चाहणा असते त्या सर्व वस्तु फुकटात,बिना कष्टाने भरपूर उपलब्ध असतात. या वस्तु उपभोगतांना कोणीही आड्वे येत नाही आणि त्या वस्तु प्राप्त करण्याकरीता कधीही पचावे लागत नाही.

७) तेथे कोणतीही वस्तु विकत घ्यावी लागत नाही.तेथे जे मनात येईल ती वस्तू घेऊन घेतात अशी तेथे रीत आहे.

८) तेथे कोणत्याही तऱ्हेची काळजी नाही व कोणास कोणतीही फिकीर होत नाही.

९) तेथे संत सदा अनेक लीलारुपी खूप आनंद मिळणारी क्रिडा म्हणजे खेळ करीत असतात.

१०) तेथे पोहचलेल्या संतांचे कपडे नित्य नवेचे नवे राहतात.

११) त्यांच्या पांघरण्यातून अतिशय आनंद देणारी सुगंधी चालत असते.

१२) तेथील संत अमृताने आंघोळ करतात म्हणून त्या देहास अतिशय हंसाला भावणारे रुप चढून येते.

१३) तेथे सुख घेण्याकरीता लागणारी सर्व संपत्ती आहे.

१४) तेथे संतांना राहण्याकरीता हिर भवन, मोती भवन,रत्न भवन,ज्ञान भवन,चिंतामणी भवन इ.असे १६ प्रकारचे बंगले आहेत.

१५) प्रत्येक बंगल्याला मण्यांचे चौक,लालचे चौक,चिंतामणीचे चौक असे ८ प्रकारचे चौक असतात.सर्व चौकास स्वयंप्रकाशित मोती जडलेले असतात.

१६) तेथे रत्नांचा व हिऱ्यांचा आकर्षित अनंत उजेड असतो.

१७) बंगल्यांना मोठ मोठाले मोती जडलेले असतात.

१८) तेथे सतविज्ञानाचे अनंत रिध्दी सिध्दीचे भंडार आहेत.
१९) संतांचे आराम करण्याचे पलंग,बंगळी ही अमर आहेत.
२०) तेथील बाग बगीचे दिव्य सुख देणारे आहेत.
२१) तेथील मोजकी समजतील व समजविता येतील अशी सुख दाखविली आहेत,त्यापेक्षाही अनंत सुख आहेत.जीवाला शब्दांमध्ये वर्णन करुन समजविता येत नाही.ती सुख घेतल्यावरच समजतात,अशा प्रकारे अमरदेश हा अनंत महासुख देणारा देश आहे.

## अमरलोकात कशा प्रकारचे दु:ख नाही

१) अमरलोकात कोणीही गरीब नाही.
२) तेथे सर्व एकसारखे श्रीमंत आहे
३) तेथील देहाची अवस्था सदा तरुण असते.ती येथील मायावी देहासारखी बालक,तरुण, म्हातारपण अशी पलटत नाही म्हणून म्हातारपणाचे दु:ख नाही.
४) तेथील देह अमर आहे,मरत नाही म्हणून परत जन्मणे नाही म्हणजे गर्भात येत नाही म्हणजे गर्भाचे दु:ख नाही.
५)तेथील संतांना मन व ५आत्मा ही माया नाही व तेथे त्रिगुणी माया नाही व तेथे त्रिगुणी माया नाही म्हणून कर्म बनत नाही म्हणून कर्म भोगण्याकरीता ८४ लक्ष योनीचे दु:ख नाही.तेथे कर्मच बनत नाही म्हणून निचकर्म बनत नाही त्यामुळे निच कर्म भोगविण्याकरीता नरकीय दु:ख नाही.
६) तेथील देह अमर आहे म्हणून अकाली मृत्यु नाही त्यामुळे भूत,पिशाच्च योनीचे दु:ख नाही.
७) तेथे मायावी देह नाही म्हणून देहाचे आजारपणाचे,लंगडे,लुळेपणाचे दु:ख नाही.
८) तेथे मायावी मन नाही म्हणून आधी म्हणजे मनाचे दु:ख नाही.
९) तेथे होणकाळाच्या देशासारखे येऊन येऊन पडणारे दु:ख नाही उलट सदा येऊन येऊन पडणारे परंतु चाहणा असेल तर घ्या असे आज्ञेत राहणारे सुख आहेत.

अशा अमर देशात होणकाळाच्या गुरु भेदाने किंवा मायेच्या ब्रम्हा,विष्णु,महादेव व शक्ती, भैरु,सितला इत्यादि गुरुने दिलेल्या भेदाने जाता येत नाही.

ही विधी महाराष्ट्रातील सतस्वरुपी संत नामदेवजी,सतस्वरुपी संत राकाजी,सतस्वरुपी संत बाकाजी,राजस्थानमधून सतस्वरुपी संत दादूजी,सतस्वरुपी संत दर्यावजी,सतस्वरुपी संत पिपाजी,पंजाब मधून सतस्वरुपी संत रामचरणजी,सतस्वरुपी संत नानकजी,काशीतून सतस्वरुपी संत कबीरजी इत्यादि असे मोजकेच संत जाणत होते.आज राजस्थानमधील आदि सतगुरु सुखरामजी महाराज यांच्या सत्तेच्या कृपेने अनेक संत ही भक्ती जाणतात.अनेक संत आदि सतगुरु सुखरामजी महाराजांची भक्ती धारण करुन अमरलोकात पोहचून गेलेत व अनेक पोहचून राहिलेत.

१२

## ✻ व्यसनाधिक ✻

तंबाखू,बिडी,सिगारेट,भांग,चरस,गांजा,हुक्का,चिलम,दारु,गुटखा,तपकिर,अफीम,अंडी,मांस,

मासोळी,व्यभिचार इ.व्यसनांचे त्यागन करणे.

*** तंबाखू का खाऊ नये ?**

तंबाखू खाल्ल्याने शरीरात निकोटीन नावाचे विष पसरते आणि त्यामुळे कॅन्सर होतो. अशाप्रकारे तंबाखू खाल्ल्याने जीवाला येथेही देहामध्ये दु:ख भोगावे लागते व देह सुटल्यावरही दु:ख भोगावे लागते.

तंबाखू खाल्ल्याने या जीवाला कोणते पाप लागते या विषयी वेदव्यासाचे पुत्र सुखदेव मुनी सांगतात,

**गुड्गुडी सो गो हत्या, ब्रम्ह हत्या नासका ।**
**मुख चाब्या सो गोत्र हत्या, कहे पुत्र व्यास का ।।**

गुड्गुडी म्हणजे हुक्का,चिलम,बिडी,सिगारेट इ.कोणतीही वस्तू पिल्याने गोहत्या म्हणजे गायीच्या हत्येचे पाप लागते.

नासका म्हणजे तपकीर नाकाने ओढल्याने ब्रम्ह म्हणजे ब्राम्हणाच्या हत्येचे पाप लागते .

मुखचाब्या म्हणजे ज्यात निकोटीन आहे अशी कोणतीही वस्तू तोंडाने खाल्ल्याने जसे–गुटखा,तंबाखू इ.गोत्र हत्येचे पाप लागते.

अशाप्रकारे तंबाखूचे सेवन केल्याने वरील सांगितल्याप्रमाणे पाप जीवाला लागतात.

तंबाखू खाल्ल्याने हा जीव नर्कात जातो किंवा अगतीत जाऊन महादु:ख भोगतो.

*** मांस का खाऊनये ?**

मांस खाल्ल्याने मनुष्याचा स्वभाव क्रोधी बनतो.क्रोध आल्याने बुध्दी जाते व बुध्दी गेल्याने सुध्दी जाते .

मांस खाल्ल्याने या जीवाला कोणते दु:ख भोगावे लागते हे कबीरजी एका साखीत सांगतात.

**मांस मांस सब एक है, क्या बकरी क्या गाय ।**
**आँखो देखी खात है, तो नरक कुंड मे जाय ।।**

मासोळी,बकरी,गाय,कोंबडी या सर्वाचे मांस एकच आहे जो आपल्या डोळ्यांनी यांची हिंसा करतांना पाहतात व मांस खातात ते नर्कात जातात.

तिळभर मांस खाल्ल्याने जीव 'रव रव' नावाच्या नर्कात पडतो व महादु:ख भोगतो.

*** दारु का पिऊनये ?**

**औगुण कहूं शराब का, ज्ञानवंत सुनि लेय ।**
**मानुस सो पशुवा करे, द्रव्य गाठि का देय ।।**

कबीरजी म्हणतात,दारुत खूप सारे अवगुण असतात ज्ञानी लोकांनी ही गोष्ट समजून घेतली पाहिजे दारु तर मनुष्याला एक प्रकारे पशु सारखे बनवून देते.त्यासाठी तो आपल्या जवळचे पैसे सुध्दा गमवून टाकतो.

दारु पिल्याने मनुष्याला क्रोध येतो.क्रोध आल्याने त्याची बुध्दी जाते व बुध्दी गेल्याने सुध्दी जाते.या कारणाने त्याला काहीही सुचत नाही.दारु पिल्याने नर्कात किंवा अगतीत जाऊन दु:ख

भोगतात.

१३

## निर्णय

**हंड्यिा कू ठमठोर के ।। लेता है सब कोय ।।**

**ध्रग मानव सुखराम के ।। एकभजन परख नहि लेहे ।।**

अर्थ – मातीचा माठ विकत घेण्या आधी निरखून पारखून घेतो,ठोकून ठोकून घेतो. जसे–तो कच्चा तर नाही,गळणार तर नाही,पाणी थंड होईल ना?असे निरखून पारखून घेतो. अशाप्रकारे सर्व छोट्या मोठ्या वस्तुंना निरखून पारखून घेतात परंतु भक्ती काळाच्या मुखातच ठेवणारी आहे या गोष्टीचा स्त्री–पुरुष पारख करत नाही व काळाच्या मुखातच ठेवणाऱ्या मायेच्या भक्त्या ८४ लक्ष योनी कापेल ही समझ करुन धारण करतात.

१४

## जीवाची ओळख

१) जीव हा आदिपासूनच सुख दु:ख नसलेल्या  या होणकाळच्या जीवब्रम्ह देशात राहत होता.

२) जीव हा सतस्वरुपापासून किंवा होणकाळापासून या दोघांपासूनही जन्मलेला नाही.

३) म्हणजेच की तो सतस्वरुपाचा किंवा होणकाळाचा या दोघांचाही अंश नाही.

४) जसा सतस्वरुप व होणकाळ आदिपासूनच आहे तसा जीवपण आदिपासूनच अमर ब्रम्ह आहे.

५) जरी जीव हा अमरब्रम्ह असला तरी त्याच्या सोबत आदिपासूनच मन व ५ आत्मा ही माया आहे.

६) जर जीवासोबत मन व ५ आत्मा ही माया नसती तर तो आदिपासूनच महासुखाच्या सतस्वरुप देशात राहिला असता.

७) परंतु जीवासोबत मन व ५ आत्मा ही माया असल्यामुळे जीव होणकाळाच्या महादु:खाच्या देशात अटकून राहिला व मायेत जरासे कृत्रिम मायेचे सुख व कुद्रती काळाचे अनंत महादु:ख भोगत राहिला व आजही भोगतो आहे.

८) जीवाला आदिपासूनच फुकटात,बिना कष्टाने,ऊब न येणारी,न खुंटणारी,आज्ञाकारी,अमर व तृप्त अशा नविन नविन अनंत महासुखाची चाहणा होती.

९) जीवाला गर्भाचे,मनाचे,तनाचे,येऊन येऊन पड्णारे,म्हातारपणाचे,८४ लक्ष योनीचे,८४ प्रकारच्या नर्काचे,भूत व पितरासारखे अगतीचे दु:ख अजिबात नको होते.

### साहेबाची चाहणा

१) सतस्वरुप साहेबालाही जीवाला जी सुख पाहिजे ती सर्व सुख देण्याची आदिपासूनच चाहणा होती.

२) परंतु जीवासोबत आदिपासूनच मन व ५ आत्मा ही माया असल्यामुळे जीव जरी ब्रम्ह असला तरी जीवाला आपल्या माया विरहित अनंत महासुखाच्या सतस्वरुप देशात नेता येत

नव्हते.

३) जीव या ब्रम्हला काळापासून मुक्त करुन आपल्या अनंत महासुखाच्या देशात नेण्याकरीता जीवाबरोबर असलेल्या विकारी मायावी मनाला व शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध या पाच विकारी आत्म्यांना वेगळे करुन जीवाला कोरा माया विरहित ब्रम्ह करणे ही गरज होती.

४) जीव कोरा ब्रम्ह बनून अमरलोकातही जावा व अमरलोकात जाईपर्यंत मायेचे सर्व सुख सतस्वरुप परमात्म्याच्या नियमाने भोगावे या उद्देशाने सतस्वरुप साहेबाने मायेची सृष्टी बनविली.

५) प्रत्येक जीवाला मनुष्य देह दिला.


६) सतस्वरुप विज्ञानाचा वापर करुन ही माया कशी कापावी याकरीता विज्ञानी सतगुरुंना सतस्वरुप परमात्म्याने पाठविले,पाठवत राहिले व आजही पाठविले आहे व पुढेही पाठवत राहतील.

## सतगुरुचा शरणा

१) आजपर्यंत जे जे जीव सतस्वरुप विज्ञानी सतगुरुंच्या भेदाच्या शरणात आले ते ते सर्व जीव माया कापून कोरे ब्रम्ह बनून महासुखाच्या अमरलोकात निघून गेले.

२) जे जे जीव सतस्वरुपाचे सतगुरु धारण न करता विकारी मन व ५ आत्म्यांच्या वश होऊन त्रिगुणी मायेशी म्हणजे काळाच्या मुखात बसलेल्या देवी देवतांशी व विकारी निच कर्मांशी जुडून राहिले ते ते सर्व जीव अनंत युगापासून आजपर्यंत अनंत दुःख भोगत राहिले.




## सृष्टी रचना

साहेबाला जीवाला मन व ५आत्मा ही माया कापण्याकरीता मनुष्य देह द्यायचा होता म्हणून लोक म्हणजे धरती लोक बनविला या करीता सृष्टीची रचना केली.

१) सतस्वरुप साहेबाने आपल्या सतस्वरुप विज्ञान कलेने होणकाल पारब्रम्हला प्रथम पुरुषाचे व इच्छेला प्रथम स्त्री चे स्वरुप दिले व ज्या विधीने प्रत्येक जीवाला मनुष्य देह मिळेल अशी संसार करण्याची रीत होणकाळ पारब्रम्ह पुरुषाला शिकविली.

२) होणकाळ पुरुष व इच्छा स्त्रीपासून शिवब्रम्ह जन्मला.

३) शिवब्रम्हपासून चिदानंदब्रम्ह जन्मला.

४) चिदानंदब्रम्हपासून महतत्व जन्मले.

५)महतत्वापासून शक्ती आणि आकाश,वायू,अग्नी,जल, पृथ्वी अशा ५ तत्वांचा जन्म झाला.

६) शक्तीने पुरुषाचे ध्यान केले तेव्हा ब्रम्हजलातून

अंड्कटाक्ष,अंड्कटाक्षातून निजलेल्या विष्णुचा जन्म झाला.विष्णुच्या नाभीतून कमळ आकाशात सुटले त्या कमळातून ब्रम्हाचा जन्म झाला.ब्रम्हाच्या भृगुटीतून शंकराचा जन्म झाला.
७) शक्तीने गौरी,लक्ष्मी व सावित्री असे तीन स्वरुप धारण केले.
८) शंकराने गौरी,विष्णुने लक्ष्मी व ब्रम्हाने सावित्री सोबत संसार केला.
९) ब्रम्हा,विष्णु,महादेव व शक्ती या चौघांनी मिळून साहेबाने दिलेल्या विज्ञान कलेच्या आधाराने धरती,आकाश,पाताळ बांधले.ब्रम्हाचा सतलोक,विष्णुचा वैकुंठलोक,शंकराचा कैलासलोक,शक्तीचा शक्तीलोक,२१ स्वर्ग, यमाची यमपूरी,स्वर्गाचे ७ भवन(भूर,भूवर,स्वर, महर,जन,तप,सत),पाताळाचे ७ भवन(तळ, अतळ, वितळ ,सुतळ ,तळातळ, रसातळ, महातळ) बांधले अशी ३ लोक १४ भवनाची रचना केली.
१०) या चौघांनी साहेबाच्या आदेशानुसार साहेबाने दिलेल्या विज्ञान कलेच्या आधाराने जीवांचे मनुष्य देह घडविले.

## जीव आपल्या आदि घरी का निघून जायचा ?

१) जीव आदिपासून होणकाळाच्या जीवब्रम्ह देशात होता म्हणजे होणकाळात होता तरीही त्याच्याजवळ आदिपासूनच सतस्वरुप साहेबाशी ज्ञानाने व ध्यानाने जुडून राहण्याचा भेद होता.
२) तो मनुष्य देहात धरतीवर येताच त्याच्यावर भविष्यात भयंकर दु:ख पडतील ही समज त्याला त्याच्याजवळ असलेल्या सतस्वरुप ब्रम्हज्ञानाने व ध्यानाने आपोआपच येत होती.
३) म्हणून तो धरतीवर येताच धरतीवर न थांबता त्याच्याजवळ आदिपासून जे सतस्वरुप ब्रम्हज्ञान होते त्या ज्ञानाच्या आधाराने ध्यान करुन पुन्हा आपल्या आदिच्या जागी म्हणजे होणकाळ पारब्रम्हमध्ये निघून जात होता.
४) जीवाला आदिपासूनच सुख पाहिजे होते आणि त्याला सुख घेण्याकरीता सुख दु:ख विरहित असा होणकाळ देश सोडून सतस्वरुप देशालाही जाता येत नव्हते.
५) म्हणून तो सुखाच्या चाहणेने वारंवार खाली येत होता व काळाचे दु:ख पडतील या भितीने सतस्वरुप विज्ञानाचा उपयोग करुन येथे धरतीवर न थांबता पुन्हा आपल्या मूळ पदाला चालला जात होता.

## ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती यांचा हिकमतीने विचार

१) ब्रम्हा,विष्णु, महेश व शक्ती यांनी हिकमतीने(चतुर युक्तिने)विचार केला.
२) मृत्युलोक व मृत्युलोक धरुन मायेचे लोक वसवायचे असेल तर जीवाला मृत्युलोकात अटकविले पाहिजे.
३) म्हणजेच त्याच्याजवळ असलेले सतस्वरुप ब्रम्हज्ञान भुलविले पाहिजे.
४) ज्यामुळे त्याला त्याच्या आदि ठिकाणी परत जाता येणार नाही.
५)ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती हे जाणत होते की जीव हा ब्रम्ह असल्यामुळे सतस्वरुप ब्रम्हज्ञान कधीही भुलणार नाही.
६) जीव हा जरी ब्रम्ह असला तरी तो एकटा नाही.त्याच्याबरोबर मन व ५ आत्मा ही माया

आहे हे ही ब्रम्हा,विष्णु, महादेव व शक्ती चांगल्या तऱ्हेने जाणत होते.
७) ब्रम्हा,विष्णु,महादेव व शक्ती यांनी हे ही चाचपले(शोधले)की जीवब्रम्हप्रमाणे जीवब्रम्हच्या सोबत असलेल्या मन व ५ आत्मांना सुखाची चाहणा आहे.
८) मन व ५ आत्मा ही माया काळ विरहित अशा अमरलोकाचे सुख घेऊ शकत नाही,उलट मायेचे सुख घेऊन मायेतच राहू शकते.
९)या करीता जीवब्रम्हसोबत असलेल्या मन व ५ आत्मा या मायेला लागणारे मायेचे सुख दिले की मन व ५ आत्म्यांच्या बरोबर कड्कडीत जुड्लेला जीव आपोआपच मृत्युलोकात अटकेल.
१०) याकरीता जीवाबरोबर असलेल्या मनाला व ५ आत्म्याला भावेल असे मायेचे अनेक सुखांचे जाळे रचावे.
११) म्हणजे हा जीव आपोआपच अटकेल व मायेचा मृत्युलोक रचेल.

## ब्रम्हा

१) ब्रम्हाने मायेचे सुख देण्याकरीता चार वेद बनविले.
१) ऋग्वेद २) सामवेद ३) अथर्ववेद ४) यजुर्वेद
२) या चार वेदात जीवासोबत असलेले मन व ५ आत्म्यांच्या सुखांचे अनेक भिन्न भेद दाखविले.
३) या सुखाच्या विध्या समजविण्याकरीता त्यातील पारंगत असे ८८,००० ऋषींना ब्रम्हाने मृत्युलोकात पाठविले.
४) या ऋषींनी जगात येऊन जत,सत,तप,यज्ञ इत्यादी सुख मिळविण्याच्या अनेक मायेच्या क्रिया करणी दाखविल्यात.
५) जीवाला मंत्र जपून आकाश मार्गाने उड्णे,जमिनीत गाडून अनेक किलोमिटरवर जमिनीच्या बाहेर निघणे,दोन भुज्यांऐवजी चार भुजा धारण करणे,पाण्यावर जमीनीसारखे चालणे व जीवाच्या मन व ५ आत्म्याला भावेल असे अनेक मंत्राचे प्रयोग करुन दाखविले.
६) अशा प्रकारे ब्रम्हाने जीवांना अनेक भिन्न भिन्न सुखांत प्रलोभित करुन अटकवायचा पूर्ण प्रयत्न केला तरीही एकही जीव ब्रम्हाच्या या सुखात बंधला नाही,उलट सतस्वरुप ध्यान करुन आपल्या आदि घरी परतत गेला.

## विष्णू

१) विष्णुने रिध्दी सिध्दीच्या मायेच्या सुखांच्या अनेक कला जीवाला व त्याच्या मन व ५ आत्म्याला भावेल अशा करुन दाखविल्या.
२) या रिध्दी सिध्दीच्या करामाती जीवांना शिकविण्याकरीता कलाधारी अवतार निर्माण केले.
३) जीवाला सुख मिळेल अशी राजरीत आणली.
४) आपसात घेणे–देणे,रुपया–पैसा असा व्यवहार निर्माण केला परंतु जीव काही केल्या सतस्वरुप ब्रम्हज्ञान सोड्त नव्हता.

## शिव व शक्ती ने हिकमतीने केलेला विचार

१) शिव व शक्तीने जीवाला फक्त सुख दिल्यास जीव सतस्वरुप ब्रम्हज्ञान कधीही सोडणार नाही ही कसर हिकमतीने शोधून काढली.
२) जीव मायेच्या सुखाकरीता हौसेने खाली येतो व काळाचे दु:ख लक्षात येताच परत आपल्या आदिघरी निघून जातो.
३) म्हणजे जीवाला फक्त सुख दिले तर जीव जाळ्यात कधीही अटकणार नाही.
४) जीव अटकला पाहिजे म्हणून त्याला सुखाबरोबर दु:ख दिले पाहिजे.
५) ब्रम्हा,विष्णुने केलेल्या सुखांबरोबर शिव व शक्तीने ज्या ज्या दु:खाने जीव मायेत अटकेल असे अनेक भिन्न भिन्न दु:ख पैदा केले.

## शिव व शक्तीने काय केले

१) ब्रम्हा,विष्णुने पैदा केलेल्या ज्या सुखात रोग पैदा करता येतील असे सुख शिव शक्तीने प्रथम शोधले.
२) ती सुख जीवाला प्रथम घेऊ दिलीत.
३) ते सुख जीव घेताघेताच त्या सुखात शिव शक्तीने रोग उत्पन्न करुन दिले.
४) जीव मायेच्या सुखात लागून गेला.
५) सुख घेतांना जीवाला झालेल्या रोग निवारणार्थ वैद्याची गरज पडायला लागली.
६)म्हणून काही जीव वैद्याचे काम शिकू लागले तर काही जीव औषधी बनविण्यात गुंतून गेले.
७) जीवाच्या मनाला व ५ आत्म्यांना भावणारे,कविता करणारे कवीश्वर पैदा केले.त्यात काही ऐकण्यात तर काही गाण्यात रमून गेले.
८) वीर बनण्याची कला प्रगट केली.त्यात काही वीर बनण्यात अटकून गेले.वीर बनने म्हणजे वीर विद्या शिकणे.तंत्र मंत्राद्वारे लोकांचे काम करणे.उदा.कुठे पाऊस पडत नसेल तेथे पाऊस पाडणे इत्यादि.
९)जीवांमध्ये काम,क्रोध,मोह,ममता असे स्वभाव पैदा केले.त्यात काही कामात तर काही क्रोध करण्यात,काही मोहात व काही ममता करण्यात जीव अटकायला लागले.
१०) भ्रम पैदा केले,कपट पैदा केले,तृष्णा उत्पन्न केली,लबाडी पैदा केली.
११) अष्ट धातूच्या मुर्त्या बनवून मुर्तीत करामात प्रगट केली.या करामातीद्वारे मुर्त्या नैवेद्य खाऊ लागल्या तेव्हा जीव मुर्त्यांना खरे मानून अटकून गेले.
१२) हे सर्व कर्म करण्यात जीवाला भूक लागू लागली म्हणून काही जीव भूक निवारणार्थ अन्न –धान्य उत्पन्न करण्यात लागून गेलेत.
१३) विषारी प्राणी सर्प,विंचू त्याचप्रमाणे डायनासोअरसारखे उदंड प्राणी बनविले.यांच्यापासून संरक्षण करण्यात लागून गेले.
१४) यंत्र,मंत्र,तंत्र,झाडाझपाटा शिकविणारे ६ दर्शनी बनविले.(जोगी,जंगम,सेवडा,संन्यासी, फकीर,ब्राम्हण)यंत्र,मंत्र,तंत्र,झाडाझपाटा यात कसे सुख आहेत हे ६ दर्शनी जीवांना दाखवायला लागले त्यात जीव अटकून गेले.

१५) दिवसा या उद्‌यमात लागायचे त्यामुळे थकवा यायचा म्हणून रात्री थकवा हरविण्याकरीता झोप कशी घ्यायची ही कला शिकविली.
१६) त्यामुळे जे न अटकलेले काही जीव दिवसा सतस्वरुप विज्ञान साधता न आल्यामुळे रात्री सतस्वरुप विज्ञान साधायचे व आदिघरी जायचे ते आदिघरी न जाता अटकायला लागले. याप्रमाणे जीव अटकायला लागले.
१७) अशाप्रकारे ज्यात कर्म लागणार नाही असे जवळ असलेले सतस्वरुप ब्रम्हज्ञान भुलून गेले व कर्म लागेल अशा त्रिगुणी मायेत रमून गेले.
१८) मन व ५ आत्म्यांच्या वश होऊन जीव मनुष्य देहाने उच-नीच मायेचे कर्म करु लागला.

## कर्म

त्रिगुणी मायेशी म्हणजे रजोगुण,सतोगुण,तमोगुणाच्या स्वभावाने क्रिया करणे याला कर्म म्हणतात.

१) रजोगुण स्वभावाने केलेले कर्म
उदा. जन्म देणे.
२) सतोगुण स्वभावाने केलेले कर्म
उदा. पालन पोषन करणे
३) तमोगुण स्वभावाने केलेले कर्म
उदा. क्रोध करणे,भांडण करणे.